Vol. 7, Issue 4, January 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**

**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera

**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

प्रा.डॉ.कु.शोभा महारु चौधरी
सहाय्यक प्राध्यापक ,
धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.



## सारांश
प्रस्तुत संशोधनात धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेण्यात आलेला आहे. त्यासाठी 140 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. माहिती संकलनासाठी डॉ. आर. आर. शर्मा यांनी प्रमाणित केलेल्या पालक प्रोत्साहन चाचणीचा तसेच मधु अग्रवाल व वर्षा कौशल यांनी प्रमाणित केलेल्या परीक्षाविषयक चिंता चाचणीचा वापर करण्यात आला. पिअरसनच्या परिघात परिगुणन पध्दतीने पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता या दोन चलांमधील सहसंबंध काढण्यात आला. धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, मुली, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही असे आढळून आले.

## प्रस्तावना :
मुलाला एकदा शाळेत प्रवेश मिळाला म्हणजे आपली जबाबदारी संपली. असा ब—याचशा पालकांचा समज असतो. परंतु मुले शाळेत जायला लागल्यावर ख—या अर्थाने पालकांची जबाबदारी वाढते. तो नियमित शाळेत जातो का? नियमित अभ्यास करतो का? अशा विविध बाबींकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे असतेत्र ब—याचदा आई—वडील दोघेही नोकरीसाठी दिवसभर घराबाहेर असतात. दोघांचे करिअर, प्रमोशन, बदल्या यामुळे पालकांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. म्हणून पालक मुलांना कोचिंग क्लासेस लावून देतात. पालकांच्या मते मुलांना क्लासेस लावले तर तेथे त्यांना अभ्यास नियमित होईल व ते परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतील. परंतु क्लासेस मधील गर्दी, वैयक्तिक मार्गदर्शनाचा अभाव या गोष्टींमुळे ब—याचवेळा पालकांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत व अपयशाचे खापर आपल्या पाल्याच्या माथी मारुन पालक मोकळे होतात.

विद्यार्थ्यांना शिक्षकाच्या किंवा क्लासेसच्या हवाली सोडून त्यांच्याकडून चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. मुलांच्या परीक्षेविषयी आपल्या जबाबदारीचे गांभीर्य पालकांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. परीक्षेच्या वेळी मुलांच्या आहार विहाराकडे लक्ष देणे. त्याने लेखन साहित्य, ओळखपत्र, प्रवेशपत्र इ. वस्तु सोबत घेतल्या का? या बाबत विचारणा करणे. मुलांकडून अवास्तव अपेक्षा न ठेवणे, त्याने केलेल्या अभ्यासाची उजळणी, सराव करुन घेणे. परीक्षा देऊन आल्यावर कठिण गेलेल्या पेपरची चिंता न करता पुढील विषयाची तयारी करण्यास सांगणे. आपण नेहमी पाल्यांसोबत आहोत याची जाणीव पालकांनी करुन दिले तर मुलांना भावनिक आधार मिळतो व त्यांचा परीक्षेचा ताण हलका होतो. पालकांच्या प्रोत्साहनाचा मुलांच्या परीक्षाविषयक चिंतेवर परिणाम होतो का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

## संशोधनाची गरज :
विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास व्हावा त्यासाठी शाळा सर्वतोपरी प्रयत्न करत असते. वेळोवेळी विविध उपक्रमांचे

आयोजन, स्पर्धा परीक्षेसाठी मुलांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कला गुणांना वाव देणे इ. आपल्या शाळेत चालणा—या विविध उपक्रमांची तसेच विद्यार्थ्यांची प्रगती कितपत झाली याची वेळोवेळी पालकांना जाणीव करुन देण्यासाठी शाळेत 'पालक—शिक्षक संघ' स्थापन केला जातो. तसेच या संघांची महिन्यातून एकदा अशी सभा ही आयोजित केली जाते. पालकांच्या आपल्या पाल्याबद्दलच्या शैक्षणिक प्रगतीविषयी अपेक्षा, शाळेकडून, शिक्षकांकडून अपेक्षा तसेच शिक्षकांच्या पालकांकडून अपेक्षा या सर्वच गोष्टींची चर्चा या सभेत होते. परंतु ब—याच शाळांना याबाबत कटु वास्तवाला सामोरे जावे लागते. पालकसभेला पालकांची नगण्य उपस्थिती असते. ठराविकच पालक सभेला उपस्थित राहतात. यावरुन पालकांची शाळेबाबत किंवा शिक्षणाबाबत अनास्था दिसून येते.

परीक्षा जवळ आली म्हणजे बरेचशे विद्यार्थी आजारी पडतात. परीक्षेच्या भीतीनेच त्यांच्या पोटात गोळा येतो. शिक्षकांच्या व पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करु शकु की नाही हेच त्यांच्या परीक्षाविषयक भीतीचे मुख्य कारण असते. वर्षभर अभ्यासाचे नियोजन नाही. नियमितपणा नाही. त्यामुळे परीक्षा आल्यावर त्यांची तारांबळ उडते अशा वेळी त्यांना पालकांकडून प्रोत्साहनाची, मदतीची गरज असते. अन्यथा विद्यार्थी परीक्षेचा एवढा ताण घेतात की, एकतर ते आजारी पडतात किंवा अस्वस्थ होऊन केलेला अभ्यासही विसरतात. मुलांची ही परीक्षाविषयक चिंता कमी करण्यासाठी पालकांनी त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

प्रस्तुत संशोधनातून शिक्षक व पालक यांना विद्यार्थ्यांच्या परीक्षेविषयक चिंतेची जाणीव होईल व ती कमी करण्यासाठी ते प्रयत्न करतील. पालकांना त्यांच्या प्रोत्साहनाचा विद्यार्थ्यांच्या परीक्षेविषयक चिंतेवर काय परिणाम होतो याची माहिती मिळेल. म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सहसंबंध आहे का ? तो कोणत्या प्रकारचा आहे? तसेच या सहसंबंधाच्या बाबतीत लिंग व क्षेत्र या घटकांनुसार वेगळेपण जाणवते का? या प्रश्नांच्या समाधानकारक उत्तरासाठी या संशोधन अभ्यासाची गरज आहे.

## उद्दिश्टे :

1) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
2) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या मुलांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
3) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या मुलींचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
4) धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.
5) धुळे तालुक्यातील शहरी भागातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

## परिकल्पना :

1) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
2) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या मुलांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
3) धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या मुलींचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
4) धुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.
5) धुळे तालुक्यातील शहरी भागातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात सार्थक सहसंबंध नसतो.

## न्यादर्श :

या अभ्यासासाठी धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या 140 विद्यार्थ्यांची सरल यादृच्छिक पद्धतीने न्यादर्श म्हणून निवड केली.

## संशोधन साधने :

या संशोधन अभ्यासासाठी डॉ. आर.आर.शर्मा यांनी तयार केलेल्या 'पालक प्रोत्साहन' चाचणीचा वापर करण्यात आला. या चाचणीत एकूण 40 विधाने असून ती पालक प्रोत्साहनाशी संबंधित आहेत. प्रत्येक विधानासाठी तीन पर्याय

दिलेले आहेत. या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.83 असून सप्रमाणता गुणांक 0.68 इतका आहे. ही चाचणी मूळ हिंदी भाषेत असून संशोधिकेने तिचा मराठी भाषेत अनुवाद केलेला आहे.

तसेच या अभ्यासात इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षाविषयक चिंता मोजण्यासाठी मधु अग्रवाल व वर्षा कौशल यांनी तयार केलेल्या 'परीक्षाविषयक चिंता' चाचणीचा वापर करण्यात आला. या चाचणीत एकूण 38 विधाने असून प्रत्येक विधानासाठी 'होय' व 'नाही' असे दोन पर्याय दिलेले आहेत. या चाचणीचा विश्वसनीयता गुणांक 0.92 असून सप्रमाणता गुणांक 0.89 इतका आहे.

### कार्यपद्धती :

या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धती वापरलेली आहे. न्यादर्शाला आवश्यक त्या सूचना देऊन पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता चाचणीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली आणि मॅन्युअलनुसार गुणदान करण्यात आले. न्यादर्शाचे संपूर्ण गट, मुले व मुली तसेच ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी असे पाच गट करण्यात आले.

### संख्याशास्त्रीय तंत्रे :

या संशोधन अभ्यासात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसनच्या परिघात परिगुणन पध्दतीने पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यामधील परस्पर सहसंबंध (r) काढण्यात आला.

### संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

खालील कोष्टकाच्या आधारे संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

**कोष्टक क्र.1**

**धुळे तालुक्यातील इ. 9 वी च्या विद्यार्थ्यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यातील सहसंबंध दर्शविणारी सांख्यिकी.**

| गट क्रं. | गटाचे नाव | एकुण विद्यार्थी | प्राप्त 'r' | स्वाधीनता मात्रा | सार्थकता स्तर | नमुना 'r' | प्राप्त 'r' व नमुना 'r' ची तुलना | 'r' ची सार्थकता | शून्य परिकल्पना निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संपूर्ण गट | 140 | –0.173 | 138 | 0.05 | 0.159 | –0.173<0.159 | सार्थक नाही | स्वीकार |
| 2 | मुले | 69 | –0.175 | 67 | 0.05 | 0.241 | –0.175<0.241 | सार्थक नाही | स्वीकार |
| 3 | मुली | 71 | –0.185 | 69 | 0.05 | 0.232 | –0.185<0.232 | सार्थक नाही | स्वीकार |
| 4 | ग्रामीण | 70 | –0.212 | 68 | 0.05 | 0.232 | –0.212<0.232 | सार्थक नाही | स्वीकार |
| 5 | शहरी | 70 | –0.134 | 68 | 0.05 | 0.232 | –0.134<0.232 | सार्थक नाही | स्वीकार |

### निष्कर्ष :

कोष्टक क्र.1 वरुन असे निदर्शनास येते की, धुळे तालुक्यातील इ. 9 वी चे संपूर्ण गटातील विद्यार्थी, मुले, मुली, ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी यांचे पालक प्रोत्साहन व परीक्षाविषयक चिंता यांच्यात ऋण सहसंबंध असून तो 0.05 स्तरावर सार्थक नाही. म्हणून परिकल्पना कं. 1 ते 5 यांचा स्वीकार करण्यात आला.

## संदर्भग्रंथ सूची :

Best John & Khan JAMES V. (2006), Research in Education. New Delhi; Prentice Hall of India Private Limited.

Mangal S.K. (November 2006), Statistics in Psychology & Education, New Delhi ; Prentice Hall of India Private Limited.

गुजराथी उन्मेष (2015),पालकनीती ,पुणे : प्रगती बुकस् प्रायव्हेट लिमिटेड.

दांडेकर रेणू (10 सप्टेंबर 2013), संवाद तरुणाईशी तरुण पिढीच्या पालकत्वाविषयी, (तृतीयावृत्ती), पुणे : मनोविकास प्रकाशन.

पडळकर सुचिता (5 फेब्रुवारी 2013), शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी, (तृतीयावृत्ती), पुणे : मनोविकास प्रकाशन.

भालेराव प्रतिभा (5 सप्टेंबर 2010), मर्मबंधातील शाळा, (प्रथमावृत्ती), पुणे : नंदिनी पब्लिशिंग हाऊस.